महाविद्यालयाच्या आवारात भ्रमणध्वनी वापरण्यास सक्त मनाई आहे.
भ्रमणध्वनी आढळून आल्यास विद्यार्थ्यांचा प्रवेश त्वरीत रद्द करण्यात येईल.

विद्यार्थ्यांची व्यक्तिगत माहिती २०१८-२०१९

माहितीपत्रक सर्वांनी वाचणे अनिवार्य आहे.



Member ID No._____

संपूर्ण नाव : _____

वर्ग : _____ तुकडी : _____ रोल नं.: _____

जन्मतारीख : _____ रक्तगट : _____

धर्म व जात : _____ प्रवर्ग : _____

ओळखपत्र क्र._____ ग्रंथालय कार्ड क्र._____ वाचक कार्ड क्र._____

शरीरावरील ओळख खुण : _____

कायमचा पत्ता : _____ गल्ली/मळा : _____

गांव _____ ता. _____ जि. _____

फोन नंबर : _____ भ्रमणध्वनी : _____

ई-मेल _____

घेतलेले विषय : १) _____ २) _____

३) _____ ४) _____

५) _____ ६) _____

७) _____ ८) _____

ग्रंथपाल **शाखा प्रमुख** **प्राचार्य**

अनुक्रमणिका

- ★ **प्रवेश घेण्यापूर्वी..... ०४**
- ★ **प्राचार्यांचे मनोगत..... ०५**
- ★ **संस्था परिचय..... ०६**
- ★ **महाविद्यालयाची माहिती.....**
  - अ) बोधचिन्ह व बोधवाक्य ब) ध्येय व उद्दिष्ट्ये
  - क) मान्यता ड) पुणे विद्यापीठ बोधचिन्ह व बोधवाक्य
- ★ **शैक्षणिक सत्रे..... ०८**
- ★ **भौतिक सुविधा..... ०९**
- ★ **विविध उपक्रम..... १०**
- ★ **विद्यार्थी कल्याण विभाग..... १३**
- ★ **विस्तारीत कार्यक्रम..... १७**
- ★ **मायग्रेशन संबंधी सूचना..... १८**
- ★ **शिष्यवृत्या व सवलती..... १९**
- ★ **विद्याशाखा निहाय अभ्यासक्रम..... २२**
- ★ **पदव्युत्तर विभाग..... ३७**
- ★ **परीक्षा विभाग..... ४५**
- ★ **परीक्षा पध्दती..... ४६**
- ★ **शिस्तपालन व अनुशासन.....**
  - १) विद्यार्थ्यांची कर्तव्ये २) सत्र मान्यतेविषयी नियम
  - ३) शुल्क विषयक नियम ४) ग्रंथालय/वाचनालय नियम
  - ५) क्रीडा विभागाचे नियम ६) प्रयोगशाळा नियम
- ★ **प्रवेश रद्द करणे व फी परतावा..... ५१**
- ★ **विश्वस्त व कार्यकारिणी मंडळ..... ५२**
- ★ **महाविद्यालय विकास समिती..... ५३**

प्रतिज्ञापत्र

हजेरी क्रमांक :

वर्ग :

मी _____ प्रतिज्ञापूर्वक असे लिहून देतो/देती की, मी पूर्णवेळ शिक्षण घेणारा विद्यार्थी आहे. ज्ञानार्जन हे माझे कर्तव्य आहे. म्हणून खालील नियमांचे कर्तव्यभावनेने पालन करील.

- सर्व तासिकांना नियमित हजर राहील. माझी किमान उपस्थिती ७५% पेक्षा अधिक राहील. याची दक्षता घेईल. ७५% पेक्षा कमी उपस्थिती असल्यास वार्षिक परीक्षा देता येणार नाही; शिष्यवृत्ती मिळणार नाही यांची मला जाणीव आहे.
- अंतर्गत चाचण्या, सत्र परीक्षेस उपस्थित राहील व प्रत्येक परीक्षेत ४०% पेक्षा आधिक गुण मिळविल.
- परीक्षेस गैरप्रकार करणार नाही. कॉपी करणाऱ्यास मदत करणार नाही.
- तास चालू असताना प्रांगणात, पडवीत, दरवाज्या-खिडक्यांसमोर उभे राहून गोंगाट करून अध्यापनात व्यत्यय आणणार नाही.
- ओळखपत्र नसल्यास मी दंडास पात्र राहील व दंडाची रक्कम रू. १००/- भरेन.
- महाविद्यालयाच्या प्रांगणात व बाहेर जर्दा-तंबाखू, गुटखा खाणार नाही. धुम्रपान करणार नाही. व्यसनमुक्ती अभियानाच्या कार्यकत्याने पकडल्यास प्रत्येक वेळी रूपये १००/- (शंभर) दंड भरील. तीन पेक्षा अधिक वेळेस पकडला गेल्यास महाविद्यालयाने प्रवेश रद्द केल्यास माझी हरकत राहणार नाही.
- महाविद्यालयाच्या प्रांगणात, स्वच्छतागृह, वर्ग-अभ्यासिका, व्हरंडा-रस्ता, टेबल-बाक आणि फर्निचर इत्यादींवर अश्लील, असभ्य लेखन करणार नाही.
- ग्रंथालयाची पुस्तके, नियतकालिके जपून वापरील. त्यावर नावे लिहिणार नाही, रेषा मारणार नाही. पाने फाडणार नाही, पुस्तके वेळेत जमा करीन, ग्रंथालय नियमांचे पालन करीन.
- संगणकाचा वापर नियमांच्या आधिन राहून करेल, गैरवापर करणार नाही.
- महाविद्यालयाच्या प्रांगणात भ्रमणध्वनी आणणार नाही.
- मी रॅगिंग संदर्भात विद्यापीठ नियमानुसार विद्यार्थी व पालक यांचे प्रतिज्ञापत्र लिहून देईल.
- अनाहूत व्यक्ती, मित्रांना महाविद्यालयात, व्हरांड्यात, वर्गात घेऊन येणार नाही.

वरील नियमांचे उल्लंघन केल्यास शिस्तभंगाच्या कार्यवाहीस मी पात्र राहील.

पालकांची सही **विद्यार्थ्याची सही**

प्रवेश घेण्यापूर्वी

शैक्षणिक वर्ष जून २०१७ पासून महाविद्यालयात ऑनलाईन प्रवेशाची सर्व वर्गासाठी सुविधा उपलब्ध आहे.

१. महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ/शासनाने जाहीर केलेल्या तारखेपर्यंत नियमानुसार विविध अभ्यासक्रमांना प्रवेश दिला जाईल. उशीरा प्रवेश दिला जाणार नाही.

२. प्रवेशाची पूर्वतयारी म्हणून खालील कागदापत्रांची पूर्तता प्रवेशापूर्वी करून ठेवणे आवश्यक आहे.

अ) शाळा सोडल्याचा दाखला व पाच प्रमाणित केलेल्या झेरॉक्स प्रती.

ब) मागील वर्गाच्या परीक्षेच्या प्रत्येक गुणपत्रकाच्या पाच प्रमाणित झेरॉक्स प्रती.

क) शिक्षणात खंड (गॅप) असेल तर ॲफेडेव्हीट व दोन प्रमाणित झेरॉक्स प्रती.

ड) मागासवर्गीय विद्यार्थ्याने मा. तहसीलदार यांच्याकडून जातीचा दाखला व त्याच्या पाच प्रमाणित झेरॉक्स प्रती

इ) आई/वडील/पालक नोकरीस असल्यास मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी त्यांचा दिनांक १/४/२०१६ ते दि. ३१/३/२०१७ या कालावधीचा वेतन, महागाई भत्ता, घरभाडे इत्यादी सर्व भत्त्यांसह नोकरीच्या ठिकाणचा कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला व त्याच्या दोन प्रमाणित झेरॉक्स प्रती.

ई) पासपोर्ट साईजचे तीन फोटो

उ) दुसऱ्या महाविद्यालयातून या महाविद्यालयात नव्याने प्रवेश घ्यावयाचा असल्यास पूर्वीच्या महाविद्यालयात मिळत असलेल्या आर्थिक सवलतीचा किंवा शिष्यवृत्तीचा मंजूरी आदेश क्रमांक व एक प्रमाणित झेरॉक्स प्रत, ना हरकत प्रमाणपत्र.

३. प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी माहितीपत्रक पूर्ण वाचावे.

४. प्रवेश अर्ज स्वत:च्या हस्ताक्षरात भरलेला असावा व प्रवेश घेतांना स्वत: उपस्थित असणे अनिवार्य (सक्तीचे) आहे.

५. प्रवेशाच्या जागा मर्यादित असल्याने सर्व कागदपत्रांची पूर्तता करून मुदतीत प्रवेश पूर्ण करावा.

६. प्रवेश घेण्यापूर्वी प्राध्यापकांचे मार्गदर्शन, स्वत:चा कल लक्षात घेऊन विषय निवड करावी. एकदा निवडलेले विषय परस्पर बदलू नयेत. विषयात बदल करावयाचा असल्यास प्रत्येक विषयासाठी विद्यापीठ नियामाप्रमाणे रूपये २००/- फी भरून बदल करता येईल.

७. शाळा सोडल्याचा दाखला महाविद्यालयात देण्यापूर्वी त्याच्या पुरेशा सत्यप्रती करून स्वत:कडे ठेवाव्यात. महाविद्यालयाकडून कोणतेही मूळ कागदपत्रे किंवा सत्यप्रती परत केल्या जात नाही.

८. प्रथम वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान वर्गात घेतलेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाने नियुक्त केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून वैद्यकीय तपासणी करून मेडिकल चेकअप् फॉर्मस् दिलेल्या मुदतीतच महाविद्यालयाकडे जमा करावेत.

९. प्रवेशासंदर्भात फलकावरील सूचना विद्यार्थ्यांनी वेळोवेळी वाचणे आवश्यक आहे.

महाविद्यालय तुमच्यासाठी

प्रिय विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो,

सर्वप्रथम उत्कृष्ट महाविद्यालयात प्रवेश घेतल्याबद्दल आपले मन:पूर्वक स्वागत !

मित्रांनो, शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे व्यक्तिचा सर्वांगीण विकास करणे. तो विकास साधण्यासाठी शिक्षक आणि विद्यार्थी दोघांनीही प्रयत्नशील असावयास हवे. महाविद्यालयाच्या प्रांगणात तुमच्या विकासासाठी अनेक गोष्टी खुल्या आहेत. गरज आहे ती तुमचा उत्साह आणि इच्छाशक्ती सातत्याने प्रेरित ठेवण्याची. आयुष्याच्या अत्यंत महत्त्वाच्या टप्यावर तुम्ही आहात. येथूनच उंच आकाशात झेपावण्यासाठी वेगवेगळी आव्हाने तुम्हाला स्वीकारायची आहेत. ती आव्हाने कशी स्वीकारायची, त्यांचा पाठलाग कसा करायचा आणि आपली स्वप्ने कवेत कशी घ्यायची या सर्व गोष्टींचे आत्मभान आपल्याला या प्रांगणात मिळणार आहे. त्यासाठी तुम्ही सतत विचारप्रवृत्त असायला हवं आणि तुमचा स्वत:वरचा विश्वास प्रचंड असायला हवा.

भाकरीची शिदोरी जशी आपली भूक भागवते. पाणी जसं आपली तहान भागवते तसेच ज्ञान आपल्या बुध्दीचे भरण-पोषण करत असते. तुम्हा सर्वांना या टप्यावर ज्ञानाची तहान, भूक लागली पाहिजे. तुम्हाला समाजात एक स्वतंत्र ओळख तयार करायची असेल तर तुमच्याकडे स्वत:चे विचार असायला हवेत आणि इतरांप्रती तुम्ही आदर करायला शिकलं पाहिजे. कारण ज्यांच्याकडे ज्ञान असते, त्यांच्याकडे विवेक असतो, नम्रता असते म्हणून तर म्हणतात ना ''विद्या विनयेन शोभते'' हे अगदी खरं आहे. मित्रांनो आज आपल्या समोर खूप महत्त्वाची आव्हाने आहेत. त्यामध्ये दुष्काळ, गरीबी, वृक्षतोड, शेतकरी आत्महत्या, पर्यावरणाचा होणारा -हास, जल व्यवस्थापन या सर्व प्रश्नांवर काम करण्यासाठी पारंपरिक रूढीबध्द उपाययोजनांचा विचार करून चालणार नाही तर नवे मार्ग, नवे आदर्श, नवे विचार शोधावे लागतील त्यासाठी महाविद्यालयात शिकत असतांना तुम्ही तुमच्या विषयाचा चोहोबाजूंनी अभ्यास करावयास हवा त्यातून जे निष्कर्ष हाती येतील त्यांचा या प्रश्नांसाठी, समाजासाठी उपयोग करावयास हवा. येणाऱ्या काळात महाविद्यालय समाजापर्यंत व समाज महाविद्यालयापर्यंत जोडत नेऊन एक नवा आदर्श समाज आपल्याला निर्माण करायचा आहे. त्यामुळे ही सर्व जबाबदारी पेलत असतांना तुम्ही या प्रवासातील वाटाडे आहात. त्यासाठी तुम्हाला आवश्यक ते मार्गदर्शन, दिशा देण्याचं महत्त्वपूर्ण काम शिक्षक जरूर पेलतील, त्यासाठी शिक्षकांबरोबर संवादी रहा. महात्मा गांधी यांनी म्हटल्याप्रमाणे,''विचारांना कृतीची जोड द्या'' तुमचे जीवन अधिक सुंदर बनवा म्हणजे समाजाला आपोआप सौंदर्य प्राप्त होईल.

या शैक्षणिक वर्षात आपले महाविद्यालय नॅक पुनर्मूल्यांकनास सामोरे जात आहे, त्या दृष्टीने आपणा सर्वांची भूमिका आणि कृती अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

आपण सर्वजण आपल्या शैक्षणिक योगदानातून यशाचे मानकरी होऊयात.

तुमच्या भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा...!!!

डॉ. रंगनाथ आहेर
प्राचार्य

परिचय

पारनेर ही प्राचीन ऋषी पराशर यांची तपोभूमी पेशवेकालीन सरदार दाभाडे यांची रणभूमी, सेनापती बापट यांची जन्मभूमी आणि समाजसुधारक पद्मभूषण अण्णा हजारे यांची कर्मभूमी आहे. असा हा सांस्कृतिक वारसा लाभलेली ही भूमी दुष्काळग्रस्त म्हणून प्रसिध्द आहे. त्यामुळे स्थलांतरीत होणाऱ्या लोकांचे प्रमाण येथे अधिक आहे. सह्याद्रीचाच एक भाग असलेल्या हरिश्चंद्र गडाच्या पर्वतरांगा पारनेरला येऊन भिडल्या आहेत. अहमदनगरपासून चाळीस किलोमीटर व पुण्यापासून नव्वद किलोमीटर अंतरावर पारनेर हे गांव १९ उत्तर अक्षांश व ७४-२६ पूर्व रेखांशावर वसलेले आहे. वारकरी संप्रदायाचा अखरेचा दुवा संत श्री निळोबाराय यांचे समाधीस्थान पारनेरपासून अवघ्या पंधरा किलोमीटर अंतरावर पिंपळनेर येथे आहे. छत्रपती शिवाजी महाराज व महादजी शिंदे यांचा पारनेर परिसरात वावर राहिला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा गुप्तहेर बहिर्जी नाईक पारनेरपासून अवघ्या पाच किलोमीटर अंतरावर हंगा येथे गढी बांधून राहिलेला आहे.

करवीर छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या त्यागातून व छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रेरणेतून इ.स. १९१९ साली अहमदनगर येथे मराठा बोर्डिंगची स्थापना करण्यात आली. राजर्षी शाहू महाराज यांनी करवीर छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या स्मरणार्थ मराठा बोर्डिंगच्या स्थापनेसाठी रूपये एक हजार व वार्षिक खर्चासाठी दरमहा दोनशे रूपयांचे अनुदान दिले यातूनच 'अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज' या शैक्षणिक संस्थेची उभारणी झाली. पारनेर तालुक्याची शैक्षणिक वाटचाल लक्षात घेता असे दिसते की, येथे इ.स. १९७० मध्ये न्यू इंग्लिश स्कूल या माध्यमिक विद्यालयाची स्थापना झाली. माध्यमिक शिक्षणाबरोबरच पारनेर तालुक्याची महाविद्यालयीन शिक्षणाची निकड ओळूखन जुलै १९७७ मध्ये या शैक्षणिक संस्थेने न्यु आर्टस्, कॉमर्स व सायन्स पारनेर या महाविद्यालयाची स्थापना केली. जुलै १९७९ मध्ये हे महाविद्यालय स्वत:च्या स्वतंत्र इमारतीत स्थलांतरीत झाले. या महाविद्यालयाच्या उभारणीत कै. भास्करराव औटी, कै. रावसाहेब म्हस्के, कै. चंद्रभान बाळाजी आठरे पाटील यांचा महत्त्वाचा सहभाग होता. तसेच महाविद्यालयाच्या विकासामध्ये माजी आमदार कै. बाबासाहेब ठुबे, कै. विनायकराव औटी, माजी आमदार मा. नंदकुमार झावरे पाटील, मा. रामनाथची वाघ, मा. सीताराम खिलारी यांचे योगदान विशेष मोलाचे आहे. प्रारंभी फक्त कला व वाणिज्य या विद्याशाखा असणाऱ्या या महाविद्यालयात १९९२ साली विज्ञान ही विद्याशाखा सुरू करण्यात आली. इ.स. १९७७ साली फक्त ६७ विद्यार्थी संख्या असलेल्या या महाविद्यालयात आजी ३००० हजार विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत. पारनेर तालुक्यातील मुला-मुलींना सुशिक्षित करणे व बहुजन समाजातील तरूणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे या उद्दिष्टाने सुरू झालेले हे महाविद्यालय आज यशस्वी वाटचाल करीत आहे.

हे महाविद्यालय अकरा एकर जागेमध्ये उभारलेले असून महाविद्यालयाने एक एकर जागा समाजकल्याण विभागास मुलींच्या वसतिगृहासाठी दिलेली आहे. महाविद्यालय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असून महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोगाची '१२ बी आणि २ एफ' मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच महाविद्यालयास नवीन प्रशासकीय इमारत, जिमखाना, क्रीडांगण, वाचनालय, संगणक विभाग व शास्त्र शाखा इमारत उपलब्ध आहे. सध्या या महाविद्यालयात ९२ शिक्षक असून १८ पी.एच.डी. पदवी प्राप्त व ०७ एम.फिल. पदवी प्राप्त आहेत. तसेच २१ शिक्षक सेट/नेट परीक्षा उत्तीर्ण आहेत. महाविद्यालयात इतर अनेक उपक्रमांबरोबर एन.एस.एस., एन.सी.सी., कमवा व शिका योजना, विशेष मार्गदर्शन योजना, बहि:शाल शिक्षण मंडळ केंद्र, स्पर्धा परीक्षा केंद्र इ. उपक्रम चालविले जातात. तसेच विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महाविद्यालय परिसरात मुलाखतीचे आयोजन केले जाते. महाविद्यालयात दरवर्षी विविध विषयांवर राष्ट्रीय चर्चासत्रांचे आयोजन केले जाते.

फेब्रुवारी २०१२ मध्ये या महाविद्यालयाचे नॅक पुनर्मूल्याकंन झाले असून **'बी श्रेणी'** प्राप्त झाली आहे. महाविद्यायास महाराष्ट्र शासनाचे जागर जाणिवांचा या अभियानांर्गत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार व चेतना अंकास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे पारितोषिक मिळालेले आहे. तसेच रस्ता सुरक्षा, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी कल्याण मंडळाचे उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. विद्यार्थिंनी वसतिगृहाची सुविधा आहे. व नवीन अद्ययावत प्रशासकीय इमारतीचे काम पूर्ण झालेले आहे., तर जिमखाना व संशोधन केंद्र, प्रशस्त ग्रंथालयाचे काम प्रगतीपथावर आहे.



शैक्षणिक सत्रे २०१८-२०१९

* प्रवेश प्रक्रिया	:	१ जून पासून
* प्रथम सत्र	:	१५ जून २०१८ ते ३० ऑक्टोबर २०१८
* प्रथम चाचणी	:	ऑगस्ट २०१८
* सत्रांत परीक्षा	:	ऑक्टोबर २०१८
* द्वितीय सत्र	:	२५ नोव्हेंबर २०१८ ते ३० एप्रिल २०१९
* द्वितीय चाचणी	:	जानेवारी २०१९

* प्रासंगिक सुट्ट्या *

* १५ ऑगस्ट २०१८	:	स्वातंत्र्य दिन
* २ ऑक्टोबर २०१८	:	महात्मा गांधी जयंती
* २६ जानेवारी २०१९	:	प्रजासत्ताक दिन
* १४ एप्रिल २०१९	:	डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

विद्यापीठ अनुदान मंडळ नवी दिल्ली (यु.जी.सी.) कडून मान्यता प्राप्त असणारे खालील व्यावसायिक अभ्यासक्रम महाविद्यालयाने सुरू केलेले आहेत.

1] Communication Skill in English

2] Functional English

3] Nursery Management & Horticultural Techniques

4] Certificate Course in Industrial Accounts Tax (CIA)

5] Journalism and Information Technology

भौतिक सुविधा

१) इमारत : (Bullding)

संस्थेने महाविद्यालयासाठी आवश्यक असणाऱ्या भव्य अशा इमारती उपलब्ध करून दिल्या आहेत. वर्ग, खोल्या, ग्रंथालय, कार्यालय, जिमखाना, मुलींचे वसतिगृह यासाठी स्वतंत्र इमारती आहेत. अभ्यागत निवासाचे बांधकाम पूर्ण झालेले आहे.

२) प्रयोगशाळा : (Laboratory)

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आर्थिक मदतीतून विज्ञान प्रयोगशाळेची इमारत व संशोधन प्रयोगशाळा पूर्ण झाली आहे. विज्ञान शाखेतील पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र तसेच भूगोल विभागांसाठी पाणी, वीज, गॅस तसेच आधुनिक उपकरणांनी युक्त स्वतंत्र प्रयोगशाळा आहेत. यामध्ये ६० संगणक, लॅन इंटरनेट, ब्रॉड बँड, यु.पी.एस. बॅटरी बॅकअप सुविधा आहे. संगणक विभागासाठीही स्वतंत्र प्रयोगशाळा आहे.

३) मध्यवर्त्ती ग्रंथालय : (Central Library)

उच्च शिक्षणात ग्रंथालयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ग्रंथालयात क्रमिक पुस्तकांबरोबर इतर सर्वच क्षेत्रातील दुर्मीळ आणि मूल्यवान ग्रंथ, संदर्भ ग्रंथांचा संग्रह करण्यात आला आहे. ग्रंथालयात एकूण ४१,८२३ ग्रंथ असून ६१ नियतकालिके व १६ वृत्तपत्रे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिली जातात. ग्रंथालयाची इमारत सर्व सोयींनी युक्त अशी आहे व अभ्यासिकेची मुले व मुलींकरिता स्वतंत्र व्यवस्था आहे. ई-लायब्ररी सुविधा ग्रंथालयाने उपलब्ध करून दिलेली आहे. ग्रंथालयाने INFLIBNET व University of Pune यांचे सभासदत्व घेतलेले आहे. प्रथम वर्ष वर्गाकरिता पाहुणा वाचक योजना ग्रंथालय विभागाकडून राबविण्यात येते. तसेच ग्रंथालय विभाग Web Opae सुविधा देते. याकरिता http/43.228.75.198/SOULWEBOPAE या Link चा उपयोग करावा.

४) क्रीडा विभाग : (Gymkhana)

महाविद्यालयाचा क्रीडा विभाग विद्यार्थ्यांच्या बौध्दिक शारीरिक विकासासाठी प्रयत्नशील आहे. महाविद्यालयाचे क्रीडांगण भव्य व प्रशस्त असून विभागामाध्ये व्हॉलीबॉल, हँड बॉल, टेबल टेनिस, कबड्डी, खो-खो तसेच भालाफेक, गोळाफेक, थाळीफेक, भारोत्तोलन, बुद्धिबळ इ. मैदानी व वैयक्तिक स्पर्धांसाठी सुविधा उपलब्ध आहे. क्रीडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पारितोषिके दिली जातात.

५) रम्य व सुंदर परिसर :

महाविद्यालय परिसरात प्रवेश केल्यावर प्रसन्न वाटावे या हेतूने जाणिवपूर्वक प्रयत्न केला जातो. वनस्पतीशास्त्र विभागासाठी स्वतंत्र वनस्पती उद्यान विकसित केले आहे. कॅक्टस गार्डन महाविद्यालयाचे आकर्षण आहे.

६) आरोग्य केंद्र : (Health Centre)

महाविद्यालयीन विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी प्राथमिक उपचारांसाठी आरोग्य केंद्र उपलब्ध आहे. आरोग्य केंद्रामार्फत महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी केली जाते. आरोग्य

केंद्रात रक्तगट तपासणी, आरोग्यविषयक सल्ला दिला जातो. आरोग्यकेंद्राच्या मार्फत विद्यार्थ्यांकरीता समुपदेशन (Coun.) उपक्रम राबविला जातो.

७) विद्यार्थिनी वसतिगृह : (Ladies Hostel)

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानातून महाविद्यालयातील विद्यार्थिनीसाठी ४० खोल्यांचे भव्य असे वसतिगृह १०० विद्यार्थिनीसाठी उपलब्ध करून दिलेले आहे. यामध्ये जेवणासाठी स्वतंत्र स्वयंपाकगृह, भोजन कक्ष, स्वतंत्र अभ्यासिका, अभ्यागतकक्ष, टी. व्ही. हॉल, २४ तास गरम व थंड पाण्याची सोय, ईनव्हर्टर मशीन, शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध आहे. विद्यार्थिनीसाठी अधीक्षिका नेमलेल्या आहेत व स्वतंत्रपणे एक समिती कार्यरत आहे. वसतिगृहामध्ये विद्यार्थिनी व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध व्याख्याने, सण व उत्सव इ. चे यशस्वीपणे आयोजन केले जाते. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थिनीसाठी विविध परीक्षेत प्राविण्य मिळविल्यास त्यांना वसतिगृह प्रवेश फीमध्ये अंशत: सवलत दिली जाते.

८) इंटरनेट सुविधा : (Internet Facility)

कार्यालय, ग्रंथालय, मध्यवर्त्ती ठिकाणी व प्रत्येक विभागात इंटरनेटची सुविधा उपलब्ध आहे. तर लवकरच महाविद्यालयाच्या आवारात वाय-फाय सुविधा उपलब्ध करत आहोत.

९) विद्यार्थिनी कक्ष (Ladies Room)

विद्यार्थिनींना मोकळ्या वेळेत अभ्यास करता यावा, चर्चा करता यावी यासाठी सर्व सोयींनी युक्त असा विद्यार्थिनी कक्ष महाविद्यालयाने उपलब्ध केला आहे.

१०) सभागृह : (Conference Hall)

वेळोवेळी होणाऱ्या कार्यक्रमांसाठी, चर्चासत्रांसाठी स्वतंत्र व आधुनिक सुविधांनीयुक्त असे सभागृह 'राजर्षी शाहू सभागृह' उपलब्ध आहे.

वरील भौतिक सुविधांव्यतिरिक्त महाविद्यालयात सायकल स्टँड, उपहारगृह, लिफ्ट यांचीही सोय आहे.

११) विद्यार्थी वसतिगृह - सुविधा उपलब्ध

विविध उपक्रम

१) राष्ट्रीय छात्र सेना : (N.C.C)

अहमदनगर जिल्ह्यातील एक आदर्श युनिट म्हणून महाविद्यालयाच्या छात्रसेनेचा नावलौकीक आहे. बी व सी. प्रमाणपत्र परीक्षांची तसेच लष्करी व मुलकी सेवेतील नोकरीच्या संधीबाबत विशेष मार्गदर्शन या विभागात दिले जाते.

*** प्रवेशांची संख्या - ५३**

*** सवलती :**

१) पॉलीटेक्निक कॉलेजला १० जागा राखीव.

२) इंजिनियरींग व वैद्यकीय प्रवेशाकरीता परीक्षेमध्ये मिळविलेल्या गुणात २ गुण वाढवून मिळतात.

३) सैन्यदलात निवडीच्या वेळी प्राधान्य

४) एन.सी.सी. च्या वतीने स्कॉलरशीप

५) महाविद्यालयाच्या वतीने बेस्ट कॅडेटची निवड

६) विद्यापीठ नियमानुसार (Ordinance No. 163) एन.सी.सी. (बी. व सी. सर्टिफिकेट धारक) १२० तासिका पूर्ण करणारे त्या त्या शैक्षणिक वर्षात ५ गुण जास्त दिले जातात.

२) राष्ट्रीय सेवा योजना : (N.S.S.)

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक व राष्ट्रीय जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. या योजनेमध्ये निवडक विद्यार्थ्यांना समाविष्ट केले जाते. या उपक्रमातून गाव, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता, वृक्षारोपण व संवर्धन, रक्तदाब व एड्स विरोधी सामाजिक जागृती सामाजिक परिवर्तन, व्यक्तिमत्त्व विकास, राष्ट्रीय कर्तव्य, नेतृत्त्व विकास, स्त्री-पुरूष समानता, साक्षरता उपक्रम, महिला सबलीकरण, बालकामगार सर्वे, भौगोलिक स्थान निश्चिती व सामाजिक, आर्थिक सर्वेक्षण याचबरोबर राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाने जे उपक्रम आखले ते सर्व कार्यक्रम एन.एस.एस. राबविते. राष्ट्रीय स्तरावर **R.D. (Republic Day)** परेडला विद्यार्थ्यांना पाठविले जाते. इतर ठिकाणाच्या विविध उपक्रमासाठी निवडक विद्यार्थी पाठविले जातात. प्रवेश संख्या : २५० इतकी असून वर्षभरामध्ये १२० तास सामाजिक/सामूहिक कार्य करावे लागते. तसेच ७ दिवसांचे विशेष शिबिर घेतले जाते यातून जिल्हा, विद्यापीठ व राष्ट्रीय पातळीवरील शिबिरांसाठी उत्कृष्ट स्वयंसेवकांची निवड केली जाते.

एन.एस.एस. व एन.सी.सी. या उपक्रमामध्ये सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ अध्यादेश १६३ नुसार वार्षिक परीक्षेमध्ये अधिक १० गुण दिले जातात.

३) पालक संघ :

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शिक्षक-पालक-विद्यार्थी यांच्यात समन्वय साधण्यासाठी पालकसंघ स्थापण्यात आला. परिसराच्या गरजा, रोजगार संधी, नवीन अभ्यासक्रम व उपक्रम याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी व वर्तमान जीवनातील आव्हाने पेलण्यासाठी विद्यार्थी सबल, समर्थ व्हावा त्याचा आत्मविश्वास वाढावा त्याची प्रगती व्हावी. हा दृष्टिकोन समोर ठेऊन पालकसंघ कार्यरत आहे. पालकांच्या वेळोवेळी बैठका होतात. त्यामध्ये विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास, शिक्षण विस्तार, लोकशिक्षण इ. उपक्रमांबाबत विचार विनियम केला जातो व महाविद्यालय प्रशासनास मौलिक सूचना केल्या जातात.

४) माजी विद्यार्थी संघ :

माजी विद्यार्थी हा महाविद्यालयाचा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. स्वत:ला आलेल्या अडचणी, अपूर्ण गरजा व उणीवावर मात करत समाजाचा जबाबदार घटक बनलेला असतो तो महाविद्यालयाचा व विद्यार्थ्यांचा मित्र व हितचिंतक बनून समस्यांवर मात करण्याची प्रेरणा देऊ शकतो. तसेच तो महाविद्यालयीन प्रशासनास मौलिक सूचना देऊ शकतो या उद्देशाने महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्यात आला आहे.

५) तक्रार निवारण कक्ष :

महाविद्यालयामध्ये शिस्त व अनुशासन राहावे यासाठी महाविद्यालयीन विविध घटकांबाबत किंवा

नियमांच्या उल्लघंनाबाबत काही तक्रार असल्यास तक्रार निवारण कक्षाद्वारे विद्यार्थी, कर्मचारी, प्राध्यापक यांना परस्पर विरूध्द तक्रार दाखल करता येतील. संबंधित घटकांस आपली तक्रार लेखी स्वरूपात सूचना पेटीमध्ये टाकता येईल. सदर समिती तक्रारीची दाखल घेऊन तक्रार निवारण करील अथवा दोषींवर योग्य ती दंडात्मक कार्यवाही केली जाईल.

६) विज्ञान मंडळ : (Science Association)

आजचे युग विज्ञानाचे युग आहे. एकविसाव्या शतकात यशस्वी होण्यासाठी मानवाला विज्ञानाचीच कास धरावी लागेल. विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत व्हावा. यासाठी विज्ञान मंडळ कार्यरत असते. विज्ञान मंडळाच्या वतीने विज्ञान विषयक निबंध स्पर्धा, तज्ज्ञ व्यक्तिंची व्याख्याने, भित्तीचित्र स्पर्धा, वैज्ञानिक सहली, विज्ञान स्पर्धा परीक्षा, विज्ञान प्रश्नमंजुषा, शिक्षक दिन इ. उपक्रम आयोजित केले जातात.

७) सामाजिक शास्त्रे मंडळ : (Social Science Association)

या मंडळावर सामाजिक, राजकीय, आर्थिक लोकतांत्रिक आणि सांस्कृतिक प्रश्नांवर व्याख्याने, चर्चा सत्रे, कार्यशाळा, प्रदर्शन इ. सामाजिक उद्‌बोधन केले जाते. सामाजिक प्रश्नांच्या संदर्भामध्ये विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण काम हे मंडळ करते.

८) भाषा व साहित्य मंडळ : (Languages Association)

मराठी, इंग्रजी व हिंदी भाषा आणि साहित्य या विषयांवर विविध उपक्रमांचे आयोजन करून त्या विषयातील महत्त्वपूर्ण बदल विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याबरोबरच भाषा, साहित्य व संस्कृती यांचे संवर्धन व्हावे व या संदर्भातील सामाजिक अभिरूची वाढीस लागावी म्हणून भाषा आणि साहित्य मंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

९) वाणिज्य व अर्थशास्त्र मंडळ : (Commerce Association)

उत्पादन, विनियम, वितरण, जाहिरात, नफा-तोटा तसेच नियोजन, अंदाजपत्रक या गोष्टींना व्यापारात महत्त्वाचे स्थान आहे. देशाच्या विकासातही या गोष्टींना महत्त्व दिले जाते. विद्यार्थ्यांनी वाणिज्य अभ्यासाचा वैयक्तिक, सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनात उपयोग करावा या हेतूने वाणिज्य मंडळ कार्य करते. वाणिज्य मंडळामार्फत, आयुर्विमा, बँकींग, मार्केटींग, जाहिरात इ. क्षेत्रातील तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात. विद्यार्थ्यांचे उद्योजकीय ज्ञान वृद्धिंगत व्हावे या हेतूने कार्यालये, व्यवस्थापन संस्था यांना शैक्षणिक भेटी दिल्या जातात.

१०) संगणक विभाग : (Computer Section)

विज्ञान युगात मानवी जीवन प्रचंड गतिमान आहे. प्रत्येक क्षेत्रात ज्ञान, संशोधन व विस्तार कार्यासाठी वर्गीकरण, आकडेवारी, संख्या, हिशोब यांचे तातडीने संकलन करणे जिकरीचे काम झाले आहे. त्यासाठी संगणकाचा वापर वाढला आहे. स्पर्धात्मक युगात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही अग्रेसर रहावे म्हणून संगणक विभाग कार्यरत आहे. या विभागाची सुसज्ज प्रयोगशाळा असून त्यामध्ये विद्यार्थी व कर्मचारी यांच्यासाठी संगणक साक्षरता उपक्रम राबविला जात आहे. या विभागात अद्ययावत् माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे. सध्या विभागांतर्गत **B. Sc.** व **M. Sc. Computer Science** व **B. C. A.** हे पदवी अभ्यासक्रम सुरू आहेत.

११) शैक्षणिक सहली :

शैक्षणिक उपक्रमाचाच एक भाग म्हणून तसेच पर्यटन उद्देश साधण्यासाठी ऐतिहासिक, भौगोलिक स्थळे, निसर्गरम्य स्थळे, उद्योग केंद्रे, संशोधन संस्था, कार्यालये यांना भेट देण्यासाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन केले जाते. वनस्पतीसंग्रह, अभ्यासक्रमाशी निगडीत प्रकल्पांचा अभ्यास करण्यासाठी प्रत्यक्ष पाहणी केली जाते. निरीक्षणातून अभ्यास हा शैक्षणिक सहलींचा उद्देश आहे.

१२) परिसर मुलाखतींचे आयोजन :

महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी वेळोवेळी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात येते.

विद्यार्थी कल्याण : विविध योजना

शिक्षण हे विद्यार्थ्यांचे शरीर, बुध्दी, भावना, व्यावसायिक कौशल्ये, कलात्मक संवेदना व जीवनमूल्यांसंबंधीची जाणीव विकसित करण्याचे साधन आहे. विद्यार्थी शिक्षणाचा केंद्रबिंदू आहे. त्याचा सर्वांगीण विकास करणे हा उच्च शिक्षणाचा उद्देश आहे. एक समर्थ आणि जबाबदार नागरिक घडविण्यासाठी विद्यापीठ व महाविद्यालय प्रयत्नशील आहेत. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांसाठी विविध योजना, विद्यापीठ अनुदान आयोग, विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व महाविद्यालयीन विद्यार्थी कल्याण मंडळ यांच्या अर्थसहाय्याने महाविद्यालयात योजना कार्यरत आहेत. या योजनांचा पुरेपुर फायदा घेण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी करावा.

१) विद्यार्थी सुरक्षा योजना :

महाविद्यालयात येणारा विद्यार्थी अपघातग्रस्त झाल्यास त्याला मदत करण्यासाठी पुढील योजना कार्यान्वित आहेत.

अ) विद्यार्थी विमा योजना :- अपघाती निधन किंवा अपघातामुळे निर्माण झालेल्या अपंगत्व यासाठी विमा योजनेतून अर्थसाहाय्य दिले जाते. अपघाती निधनासाठी रू.१,००,०००/- व अपघातानंतरच्या औषधोपचारासाठी रू. १०,०००/- व एखादा अवयव निकामी झाल्यास रू. २५,०००/- विमा कंपनीकडून नुकसान भरपाई म्हणून दिली जाते. त्यासाठी योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

ब) आपत्कालीन सहाय्य :- अपघातामुळे विद्यार्थ्यास इजा पोहोचल्यास त्याला तातडीने अर्थसहाय्य मिळावे म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून हे सहाय्य देण्यात येते. त्यासाठी योग्य तो प्रस्ताव प्राचार्यांमार्फत विद्यापीठाकडे पाठविणे आवश्यक आहे.

२) विद्यार्थी आरोग्य योजना :-

महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याबरोबरच त्यांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी आरोग्य विषयक तपासण्या करण्यात येतात व त्यांना आवश्यकतेनुसार वैद्यकीय सल्ला देण्यात येतो. विद्यार्थ्यांसाठी आरोग्य योजनेतंर्गत पुढील उपक्रम राबविले जातात.

अ) प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी

ब) रक्तगट तपासणी

क) विद्यार्थिनींसाठी हिमोग्लोबीन आणि रक्तगट तपासणी केली जाते.

३) स्पर्धापरीक्षा व व्यवसाय मार्गदर्शन केंद्र :-

महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, व्यवसाय व स्वयंरोजगाराबाबत मार्गदर्शन केले जाते.

या विभागामार्फत विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांची माहिती दिली जाते. त्याचबरोबर या परीक्षांसाठी तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात. यामध्ये विशेषत: व्यक्तिमत्त्व विकास, मुलाखतीचे तंत्र, नोकरीच्या संधी व स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी याविषयी मार्गदर्शन केले जाते.

अ) व्यवसाय मार्गदर्शन :-

यामध्ये वेगवेगळे व्यवसाय सुरू करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले जाते. तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करून प्रकाशित माहिती विद्यार्थ्यांसाठी प्रदर्शित केली जाते.

ब) प्लेसमेंट सेल :-

महाविद्यालयात प्लेसमेंट सेल कार्यरत असून त्यामार्फत नोकरीसाठी असलेल्या संधी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दिल्या जातात. विविध औद्योगिक क्षेत्रातील नामांकित कंपन्यांशी सुसंवाद साधून महाविद्यालयामध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन केले जाते. अनेक विद्यार्थ्यांनी या कॅम्पस इंटरव्हूचा फायदा करून घेतला आहे. या उपक्रमाद्वारे अनेक विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांत नोकरीच्या संधी प्राप्त झाल्या आहेत.

४) गरीब विद्यार्थी सहाय्य योजना :-

महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या अत्यंत गरीब अशा सुमारे ५० विद्यार्थी/विद्यार्थिंनीना प्राध्यापकांच्या सहकार्याने प्रत्येकी रूपये रू. ३०००/ चे अर्थसहाय्य देण्यात येते.

५) राजमाता जिजाऊ विद्यार्थिंनी मंच :-

या मंचच्या वतीने केवळ विद्यार्थिंनींसाठी पुढील उपक्रम राबविण्यात येतात.

अ) विद्यार्थिंनी व्यक्तिमत्त्व विकास योजनेखाली – मुलींची शिबिरे, तज्ज्ञांची व्याख्याने, स्वयंरोजगार मार्गदर्शन, विविध विषयांवर मेळावे इ.

ब) निर्भय कन्या अभियान – महाविद्यालयात समाजात आणि घरी मुलींना अधिक निर्भयपणे, मोकळेपणे वावरता येईल. त्यांचा आत्मविश्वास वाढेल असे उपक्रम या अभियानाद्वारे आयोजित केले जातात.

क) हिमोग्लोबीन तापसणी – आरोग्याची योग्य ती काळजी न घेतल्याने मुलींना अनेक शारीरिक समस्यांना सामोरे जावे लागते. त्याचाच एक भाग म्हणून मुलींची हिमोग्लोबीन तपासणी, रक्तगट चाचणी, वैद्यकीय सल्ला दिला जातो.

६) संवाद कौशल्य व व्यक्तिमत्त्व विकास योजना :-

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध होण्याकरिता सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या प्रेरणेतून महाविद्यालयात वरील शिबिराचे

वर्षातून तीन वेळेस आयोजन केले जाते. यामध्ये तज्ज्ञ मार्गदर्शक हे विद्यार्थ्यांना संवाद कौशल्य व व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर मार्गदर्शन करतात. प्रत्येक शिबिराचा कालावधी दहा दिवसांचा असतो.

७) विशेष मार्गदर्शन योजना :-

अभ्यासक्रमात असलेल्या कठीण वाटणाऱ्या विषयाबाबत न्यूनगंड कमी व्हावा, विषयाबाबत आत्मविश्वास वाढावा म्हणून ज्या तासांचे सरावाचे आयोजन करून या गरजू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते.

८) कमवा आणि शिका योजना :-

सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कमवा व शिका योजनेत आर्थिकदृष्ट्या या गरीब असलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी विविध विभागातून कामे देऊन आर्थिक मदत केली जाते. ४५ रू. तासाप्रमाणे मानधन दिले जाते. 'ज्ञान बनो कर्मशील कर्म ज्ञानवान' या सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्या गीतातील पंक्तीचा विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव येतो.

९) विद्यार्थी संवाद :-

विद्यार्थी संसद हे विद्यार्थ्यांचे कृतीशील व्यासपीठ आहे. विद्यापीठ कायद्याने निश्चित केलेल्या आराखड्यानुसार विद्यार्थी प्रतिनिधींची संसद तयार करून महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांच्या नियोजनात त्यांचा सहभाग घेतला जातो.

१०) सांस्कृतिक मंडळ :-

महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी व त्यांच्या कलागुणांचा आविष्कार करण्यासाठी सांस्कृतिक मंडल कार्यशील असते. विद्यार्थ्यांच्या गायन, अभियन, वादन, विनोदबुध्दी, प्रगल्भता या गुणांना व्यासपीठ मिळावे म्हणून नाटक, एकांकिका, नाट्यछटा, एकपात्री प्रयोग, पथनाट्य या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते चालू घडामोडीतील सामाजिक, राजकीय, शैक्षणिक ज्वलंत प्रश्नांवर आपले परखड मत मांडता यावे म्हणून वादविवाद स्पर्धा घेण्यात येतात. तसेच त्या-त्या वर्षी काही विशेष उपक्रम असतील तर त्यांचे आयोजन केले जाते.

११) चेतना वार्षिक नियतकालिक :-

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये साहित्यिक लपलेला असतो. त्याच्या सृजनशीलतेला चालना देण्यासाठी, त्याची प्रगल्भता, रसग्रहण, आकलन यासाठी महाविद्यालयात चेतना वार्षिक अंक काढला जातो. त्यामध्ये कथा, कविता, वैचारिक लेख, समीक्षा, विनोद, वैज्ञानिक लेख इ. लेखनाला प्रसिध्दी दिली जाते. या माध्यमातून विद्यार्थ्यांची लेखनशैली वाढण्यास मदत होते. सन २०१३-१४ या वर्षात चेतना नियतकालिकास पुणे विद्यापीठाचा पुरस्कार मिळाला.

१२) 'युवाचेतना' :-

सन २०१२-१३ या वर्षापासून युवाचेतना हे पाक्षिक महाविद्यालय प्रकाशित करत आहे. यामध्ये महाविद्यालयातील विविध विकासात्मक गोष्टी या विविध उपक्रमांचा सामावेश व शिक्षक, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी यांनी लिहिलेले विविध लेख प्रसिध्द केले जातात.

१३) 'निर्भय कन्या' अभियान :-

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी हे अभियान महाविद्यालयात राबविण्यात येते. या योजनेतंर्गत मुलींसाठी मार्गदर्शन वर्ग, व्याख्याने, शिबिरे यांचे आयोजन केले जाते. त्यात प्रामुख्याने स्वसंरक्षण, आरोग्य आणि इतर साहस उपक्रमांचा समावेश असतो.

१४) व्यसनमुक्ती अभियान :-

विडी, तंबाखू, गुटखा आदी पदार्थाचे सेवन टाळण्यासाठी महाविद्यालयात व्यसनमुक्ती अभियान चालविले जाते. या अभियानात समाज, विद्यार्थी तसेच कर्मचारी यांचा सामाजिक जाणिवेतून समावेश केला आहे. महाविद्यालयाचा विद्यार्थी व्यसनमुक्ती प्रचार, प्रसाराचा कार्यकर्ता असावा म्हणून त्याच्यासाठी वैद्यक तज्ज्ञांचे, समुपदेशकांचे मार्गदर्शन उपलब्ध केले जाते. विद्यार्थ्यांना व्यसनांच्या दुष्परिणामांची जाणीव निर्माण व्हावी म्हणून निबंध स्पर्धा, भित्तिपत्रक स्पर्धांचे आयोजन केले जाते. महाविद्यालय परिसरात व्यसनी पदार्थांचे सेवन करणाऱ्या विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना दंड केला जातो.

१५) 'पाहुणा वाचक' (पावा) योजना :-

शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ पासून महाविद्यालयात ग्रंथालय विभागाने पारनेर परिसरातील वाचकांसाठी 'पाहुणा वाचक' (पावा) योजना महाविद्यालयाने सुरू केलेली असून त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे.

१६) बहि:शाल शिक्षण मंडळ :-

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ आणि बहि:शाल शिक्षण मंडळ चालविले जाते. व्याख्याने, कार्यशाळा, उद्‌बोधन इ. उपक्रमांतून समाज व विद्यार्थी प्रबोधन केले जाते. तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने, डॉ. जयकर व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते.

१७) प्रमाणपत्र अभ्यासक्रम :-

महाविद्यालयात खालील प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविले जातात.

१) **Skill Bases Course "Banking and Accounting"**

२) मानव अधिकार शिक्षण

३) वृत्तपत्र विद्या व माहिती तंत्रज्ञान

विस्तारित कार्यक्रम (Extension Programmes)

१) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र, पारनेर (५१४९ ॲ) :-

लोकविद्यापीठाच्या भूमिकेतून 'सर्वांसाठी शिक्षण' या ध्येयाने व्यापक शैक्षणिक चळवळ उभी करण्यासाठी न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, पारनेर अभ्यासकेंद्रामार्फत पूर्वतयारी व बी. ए. हे शिक्षणक्रम १९९९ पासून राबविले जातात.

२) परकीय भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम :-

महाविद्यालयात इंग्रजी विभागाच्या पुढाकाराने परकीय भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम वर्ग सुरू करण्यात आले आहेत. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये जर्मन भाषेचा वर्ग चालविण्यात आला असून पुढील शैक्षणिक वर्षापासून जर्मन सोबतच स्पॅनिश व जपानी भाषेचा वर्ग सुरू करण्याचा मानस आहे.

३) 'पर्यावरण जाणीव जागृती' :-

शैक्षणिक वर्षे २००७-२००८ पासून सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाने एस. वाय. बी. ए. / बी. एस्सी. / बी. कॉम. या वर्गांसाठी पर्यावरणीय जाणीव जागृती हा सक्तीचा विषय सुरू केला. त्यानुसार पर्यावरण जाणीव जागृती हा विभाग महाविद्यालयात सुरू झाला. पर्यावरणाविषयी विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती व्हावी या उद्देशाने या विभागामार्फत विविध उपक्रम राबविले जातात. पर्यावरणाशी संबंधित प्रकल्प तयार करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते.

४) 'एक विद्यार्थी एक झाड' योजना :-

सावित्राबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली गत शैक्षणिक वर्षांपासून 'एक विद्यार्थी एक झाड' ही योजना राबविण्यात येत आहे. पर्यावरण संतुलनासाठी युवकांचे सहकार्य घेऊन स्थानिक परिसरात वृक्षांची लागवड करून त्यांचे संवर्धन करणे हा या योजनेचा उद्देश आहे. विद्यार्थ्यांनी ही झाडे सार्वजनिक आणि खाजगी ठिकाणी लावून जतन केली आहेत.

५) आपत्ती व्यवस्थापन :-

शैक्षणिक वर्ष २००९-२०१० पासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पदवी स्तरावर आपत्ती व्यवस्थापन हा विषय सक्तीचा केला आहे. आपत्तीचा सामना करण्यासाठी पूर्व प्रशिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे तसेच त्यांच्यामध्ये साहस व सामर्थ्य निर्माण व्हावे या उद्देशाने हा विषय सुरू करण्यात आलेला आहे.

अन्न व प्रशासन महाराष्ट्र राज्य भेसळ प्रतिबंधन कायदा १९५४ (४) सेक्शन ७ अन्वये महाविद्यालयाच्या सभोवताली शंभर मीटर परिसरात तंबाखूशी निगडीत वस्तू विशेषत: गुटखा, तंबाखू, सिगारेट यांची विक्री करणे, साठा करणे, बाळगणे अथवा खाणे गुन्हा आहे.

विविध शिष्यवृत्ती माहिती

-: ई. बी. सी. विभाग :-

विविध शुल्क सवलत व शिष्यवृत्या	अटी व पात्रता	लागणारी प्रमुख कागदपत्रे
१) ई. बी. सी. (आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय प्रवर्गासाठी	१) वार्षिक उत्पन्न रू. १,००,००० पेक्षा कमी असावे. २) विद्यार्थी वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण असावा. ३) विद्यार्थ्यांचे वडील हयात नसतील तर अर्ज आईने भरावा. ४) आई व वडील हयात नसतील तर ते हयात नसल्याबद्दलचे गॅझेटेड ऑफिसर अगर जबाबदार अधिकाऱ्याच्या सहीचे निवेदन सादर करावे. ५) सदरची शुल्क सवलत दोन अपत्यांपर्यंत मिळते.	उत्पन्नाचा दाखला फक्त तहसिलदार यांचा
२) प्राथमिक शिक्षकांचे मुलामुलींना मिळणारी शुल्क सवलत पी.टी.डब्ल्यु	१) विद्यार्थी शिक्षकाचा मुलगा/मुलगी असावी २) विद्यार्थी वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण असला पाहिजे	१) आई-वडील ज्या ठिकाणी काम करतात त्यांची नेमणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांचा सहीचा दाखला २) गुणपत्रकाच्या २ सत्यप्रती
३) प्राथमिक शिक्षकांचे मुलामुलींना मिळणारी शुल्क सवलत एस.टी.डब्ल्यु	१) विद्यार्थी शिक्षकाचा मुलगा/मुलगी असावी २) विद्यार्थी वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण असला पाहिजे	१) आई-वडील ज्या ठिकाणी काम करतात त्यांची नेमणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांचा सहीचा दाखला २) गुणपत्रकाच्या २ सत्यप्रती
४) स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती	१) हिंद सेना, गोवा मुक्ती व भुतपूर्व हैद्राबाद संस्थानात जबाबदार सरकार स्थापन करण्याबाबत ज्यांनी भाग घेतला अशांच्या मुलामुलींना, नातवांना सवलत २) मुलगा मयत झाला असल्यास त्याच्या पाल्यांना शुल्क माफी व सवलत मिळते.	१) ठरावीक नमुन्यात करारनामा २) सन्मानपत्राची खरी नक्कल ३) उत्पन्नाचा दाखला ४) गुणपत्रकांच्या सत्य २ प्रती ५) मागील वर्षी शिष्यवृत्ती मिळत नसल्यास तसा शाखा-प्रमुखाकडून दाखला आणावा
५) माजी सैनिकांच्या मुला-मुलींना किंवा पत्नीसाठी असणारी शैक्षणिकसवलत	महाविद्यालयीन सर्व पात्र विद्यार्थ्यांसाठी	१) शासकीय दाखला (सैनिक) २) गुणपत्रकाच्या दोन प्रती ३) जिल्हा सैनिक बोर्डाचा विहित नमुन्यातील अर्ज
१) भारत सरकार शिष्यवृत्ती (मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता) एन.टी./एस.बी.सी./ओ.बी.सी.	१) मागासवर्गीय विद्यार्थी २) मागील वर्षी उत्तीर्ण ३) एकाच कुटुंबातील दोन अपत्यांना शिष्यवृत्ती मिळू शकते. ४) उत्पन्न मर्यादा रू. १,००,०००/- पर्यंत	१) नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांने शासनाच्या वेबसाईटवर ऑनलाईन शिष्यवृत्ती फॉर्म भरणे आवश्यक आहे. २) नुतनीकरण किंवा शैक्षणिक गॅप असलेल्या विद्यार्थ्यांने नुतनीकरण फॉर्म भरावा व द्वितीय किंवा तृतीय

विविध शुल्क सवलत व शिष्यवृत्त्या	अटी व पात्रता	लागणारी प्रमुख कागदपत्रे
२) भारत सरकार शिष्यवृत्ती (मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता) एस.सी.	उत्पन्न मर्यादा रू. २,००,०००/- पर्यंत	वर्षात महाविद्यालयीन प्रवेशीत) महाविद्यालयाशी संपर्क करून ऑनलाईन फॉर्म ट्रान्सफर करावा. **३) ऑनलाईन फॉर्म बरोबर खालील कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक** १) जातीचा दाखला सत्यप्रत २) मागील वर्षाचा मा. तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला ३) प्रवेश पावती सत्यप्रत ४) आधारकार्ड सत्यप्रत ५) नवीन प्रवेश असल्यास शाळा सोडल्याचा दाखला सत्यप्रत ६) वडील हयात नसल्यास वडीलांचे मृत्युचा दाखला सत्यप्रत ७) राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक सत्यप्रत ८) शैक्षणिक खंड असल्यास मा. तहसिलदार यांचे गॅप सर्टिफिकेट ॲफिडेव्हिट टिप : ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्यांने आपला वर्ग, कॅटगरी, बँक खाते नंबर, शिकत असलेला वर्ग अनुदानित की विना अनुदानित याबाबत खात्री करून आपली व पालकांची स्वाक्षरी घेऊन फॉर्म जमा करणे आवश्यक
३) भारत सरकार शिष्यवृत्ती (मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता) एस.टी.	उत्पन्न मर्यादा रू. २,००,०००/- पर्यंत	
४) राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती (एस.सी./ एन.टी./एस.बी.सी. प्रवर्गातील विद्यार्थीकरिता)	१) विशेष प्राविण्यासह एस.एस.सी. २) किमान गुण ७५% व त्यापेक्षा अधिक ३) उत्पन्न मर्यादा नाही.	१) विहित नमुन्यातील अर्ज २) जातीचा दाखला विद्यार्थ्यांचा ३) गुणपत्रकाच्या दोन सत्यप्रती
५) राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती	१) एस.एस.सी. परीक्षेत किमान गुण ७५% २) शिष्यवृत्तीचा लाभ दोन वर्षासाठी असतो ३) उत्पन्न मर्यादा	१) विहित नमुन्यातील अर्ज २) गुणपत्रकाच्या दोन सत्यप्रती ३) मा. तहसिलदार यांच्याकडील उत्पन्नाचा दाखला
६) राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती	१) एस.एस.सी. परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण २) शिष्यवृत्ती कालावधी दोन वर्षे ३) उत्पन्न मर्यादा ३५,०००/- ४) एस.एस.सी. परीक्षा ज्या शाळेत उत्तीर्ण झाला आहात त्या शाळेकडून फॉर्म उपलब्ध होतात.	१) विहित नमुन्यातील अर्ज २) गुणपत्रकाच्या दोन सत्यप्रती ३) मा. तहसिलदार यांच्याकडील उत्पन्नाचा दाखला
७) अपंग शिष्यवृत्ती	१) ४०% पेक्षा आधिक गुण असेल २) उत्पन्नाचा दाखला	१) विहित नमुन्यातील फॉर्म २) गुणपत्रिकेच्या दोन सत्य प्रती ३) मा. तहसिलदार यांचे सहीचा उत्पन्नाचा दाखला मुळ प्रत व सत्य प्रती ४) जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेले अपंगप्रमाणपत्र २ छायांकित प्रती ५) प्रवेश पावती सत्यप्रत

विविध शुल्क सवलत व शिष्यवृत्त्या	अटी व पात्रता	लागणारी प्रमुख कागदपत्रे
८) बी.सी. फ्रीशीप	१) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना एकवेळ नापास झालेल्यांना फी सवलत मिळते. २) उत्पन्न मर्यादा रू.१,००,०००/ च्या पुढे व रू. ६,००,०००/- च्या आत उत्पन्न असणे आवश्यक ३) एकाच कुटुंबातील दोनपेक्षा जास्त अपत्य असल्यास लाभ मिळणार नाही.	१) वरील प्रमाणे दोन प्रतीत
९) एकलव्य आर्थिक सहाय्य योजना (फक्त पदव्यूत्तर वर्गासाठी)	१) पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी २) पदवी परीक्षेत कला व वाणिज्य शाखेत किमान ६०% गुणांसह उत्तीर्ण २) विज्ञान शाखेत ७०% गुणासह उत्तीर्ण	१) विहित नमुन्यातील फॉर्म २) पदवी परीक्षेचे गुणपत्रक ३) तहसीलदार उत्पन्नाचा दाखला
१०) हिंदी शिष्यवृत्ती	१) पदवी वर्गाला हिन्दी विषय घेणाऱ्या साठी २) वार्षिक परीक्षेत हिंदी विषयात किमान ६०% गुण	१) गुणपत्रकाच्या २ सत्य प्रती (पाठपोठ)
११) दक्षिणा फेलोशिप	१) जो विद्यार्थी पदवी परीक्षेत प्रथम श्रेणीत आले असतील असे विद्यार्थ्यांना अर्ज करावा.	१) विहित नमुन्यात अर्ज २) गुणपत्रकाच्या दोन सत्यप्रती
१२) गणित व भौतिकशास्त्र शिष्यवृत्ती	१) इ. १२ वी सायन्स मध्ये गणित व भौतिकशास्त्र विषयाला किमान ६०%	१) गुणपत्रकाच्या दोन सत्यप्रती
१३) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती	१) किमान ६०% गुण इतर कोणतीही शिष्यवृत्ती मिळालेली नसावी. (देवदासी, वारंगणा, एडस्ग्रस्त मातांच्या मुलींना विशेष प्राधान्य)	१) गुणपत्रकाची सत्यप्रत २) तहसीलदार उत्पन्नाचा दाखला. ३) राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक
१४) आर्थिक दुर्बल घटकातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य	१) तहसीलदार उत्पन्नाचा दाखला २) मागील वर्षात ६०% पेक्षा जास्त गुण आवश्यक	१) उत्पन्नाचे बाबातचे हमीपत्र (२०/- चे स्टॅम्प पेपरवर मा. प्राचार्य यांचे सही शिक्यानिशी २) गुणपत्रकाची सत्यप्रत ३) मा. तहसीलदार यांचा उत्पन्नाचा दाखला ४) राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक
१५) आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर देण्यात येणारी शिष्यवृत्ती	१) माध्य. शालांत परीक्षेत किमान ५०% गुण आवश्यक २) वार्षिक उत्पन्न मर्यादा रू. ३०,०००/-	१) गुणपत्रकाची सत्यप्रत २) तहसीलदाराचा उत्पन्नाचा दाखला ३) महा. प्रवेश पावतीची सत्यप्रत ४) राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक
१६) अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती	१) रहिवासी दाखला २) किमान ५०% गुण प्राप्त ३) अर्जदार इतर कोणत्याही योजनेचा लाभधारक नसावा.	१) बँक पासबुक सत्यप्रत २) प्रवेश पावतीची सत्यप्रत ३) गुणपत्रक सत्यपत ४) शाळा सोडल्याच्या दाखल्याची सत्यप्रत ५) रेशन कार्ड सत्यप्रत ६) रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्र
१७) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती	१) तहसीलदार यांचा उत्पन्नाचा दाखला २) मागील वर्षाचे परीक्षेत जास्त गुण	१) मार्कशीट २) तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला ३) आधारकार्ड ४) राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक झेरॉक्स

विद्याशाखा निहाय अभ्यासक्रम

* कला शाखा

विषय	प्रथम वर्ष प्रवेश मर्यादा अनुदानित-२४० विना अनुदानित-१२०	द्वितीय वर्ष प्रवेश मर्यादा अनुदानित-२४० विना अनुदानित-१२०			तृतीय वर्ष प्रवेश मर्यादा अनुदानित - २४० विना अनुदानित - १२०		
	सामान्य स्तर	सामान्य स्तर	विशेष स्तर-१	विशेष स्तर-२	सामान्य स्तर	विशेष स्तर-१	विशेष स्तर-२
१) सक्तीचे विषय	१०१७	२०१७	.....	.....	३०१७	.....	.....
२) मराठी	१०२७	२०२७	२०२८	२०२९	३०२७	३०२८	३०२९
३) हिंदी	१०९४	२०९४	२०९५	२०९६	३०९४	३०९५	३०९६
४) अर्थशास्त्र	११५७	२१५७	२१५८	२१५९	३१५७	३१५८	३१५९
५) राज्यशास्त्र	११६४	२१६४	२१६५	२१६६	२१६४	३१६५	३१६६
६) इतिहास	११७७	२१७७	२१७८	२१७९	३१७७	३१७८	३१७६
७) भूगोल	१२०७	२२०७	२२०८	२२०९	३२०४	३२०५	३२०६
८) ऐच्छिक इंग्रजी	१३३७	२३३७	२३३८	२३३९	३३३७	३३३८	३३३९
९) फंक्शनल - I	१८५७	.....	.....	.....	.....	.....	.....
१०) इंग्लिश - II	१८५८	.....	२८५७	२८५८	.....	३८५७	३८५८
११) सक्तीचा पर्यावरण जनजागृती	.....	२९९	२८५१	२८५२	.....	३८५१	३८५२
१२) Physical Education Scheme	.....	.....	.....	....	.....	.....	.....

टिप :-

❶ प्रथम वर्षासाठी मराठी, हिंदी, ऐच्छिक इंग्लिश यांपैकी फक्त दोन विषयांची निवड करता येईल. एकूण सहा विषयांची निवड करावयाची असून प्रत्येक विषय १०० गुणांचा असेल, फंक्शनल विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मराठी किंवा हिंदी विषय घेता येणार नाही.

◈ २० गुण सत्रांत परीक्षा आणि ८० गुण वार्षिक परीक्षा अशी राहील.

❷ प्रथम वर्षासाठी निवडलेल्या विषयातून द्वितीय वर्षासाठी सक्तीच्या इंग्रजी बरोबर सामान्य स्तरावर तीन व विशेषस्तरावर दोन असे एकूण सहा विषय निवडता येतील. सामान्य व विशेष स्तरावर घ्यावयाचा विषय विद्यार्थ्याने प्रथम वर्षामध्ये घेतलेल्या विषयांपैकीच असेल.

❸ द्वितीय वर्षासाठी सक्तीचा १०० गुणांचा पर्यावरण जनजागृती विषय राहील. मिळालेल्या गुणांचा श्रेणी स्वरूपात गुणपत्रकात समावेश केला जोईल. या विषयात उत्तीर्ण झाल्याशिवाय पदवी मिळणार नाही.

❹ द्वितीय वर्षासाठी निवडलेले विषय तृतीय वर्षासाठी कायम राहतील.

❺ प्रवेशाच्या वेळी निवडलेले विषय पुढे बदलता येणार नाही.

Commerce Faculty

F.Y.B.Com.

Sr. No.	Subject Code	Subject
01	1113	Functional English
02	1123	Financial Accounting
03	1133	Business Economics
04	1143	Mathematics & Statistics
Optional Subject		
05	1343	Banking & Finance
06	1253	Marketing & Salessmanship
07	1523	Marathi

S.Y.B.Com.

Sr. No.	Subject Code	Subject
01	2113	Business Communication
02	2123	Coprporate Accounting
03	2133	Business Economics (Macro)
04	2143	Business Management
05	2153	Elements of Company Law
Special Subject		
06	2223	Banking & Finance (Special papar-I)
07	------	Environmental Awarness

T.Y.B.Com.

Sr. No.	Subject Code	Subject
01	3113	Business Regulatory Framwork
02	3123	Advanced Accounting
03	3133	Indian & Global Economic Development
04	3153	Auditing and Taxation
Special Subject		
05	3421	Banking & Finance (Special papar-II)
06	3423	Banking & Finance (Special papar-III)

- **प्रथम वर्ष वाणिज्य :-** १) या वर्षासाठी एकूण सात विषय घेणे आवश्यक आहे. २) अकौंटन्सी या विषयांच्या गुणांची विभागणी २० गुण सत्रांत परीक्षा, २० गुण प्रात्यक्षिक परीक्षा, ६० गुण वार्षिक परीक्षा असे असून बाकी पाच विषयांसाठी २० गुण सत्रांत परीक्षा व ८० गुण असे राहील.
- **द्वितीय वर्ष वाणिज्य :-** १) या वर्षासाठी एकूण सहा विषय घेणे आवश्यक आहे. २) बिझिनेस कम्युनिकेशन आणि बँकिंग ॲण्ड फायनान्स विषयांच्या गुणांची विभागणी २० गुण सत्रांत परीक्षा, २० गुण प्रात्यक्षिक परीक्षा आणि ६० गुण वार्षिक परीक्षा असे असून बाकी चार विषयांसाठी-२० गुण सत्रांत परीक्षा आणि ८० गुण वार्षिक परीक्षा अशी राहील.
- **तृतीय वर्ष वाणिज्य :-** १) या वर्षासाठी एकूण सहा विषय घेणे आवश्यक आहे. ऑडीटिंग व टॅक्सेशन बँकिंग ॲण्ड फायनान्स-II आणि बॅकिंग ॲण्ड फायनान्स-III या विषयांची गुण विभागणी-२० गुण संत्रात परीक्षा, २० गुण प्रात्यक्षिक परीक्षा आणि ६० गुण वार्षिक असे बाकी तीन विषयांसाठी-२० गुण सत्रांत परीक्षा व ८० गुण वार्षिक परीक्षा असे राहील.
- **सूचना :** प्रथम व द्वितीय वर्षाकरीता २ थिअरी आणि एक प्रॅक्टिकल ए.टी.के.टी. ची सवलत मिळते. प्रथम वर्षाचे वरीलप्रमाणे ३ विषय राहिल्यास द्वितीय वर्षात प्रवेश मिळू शकतो. तसेच वरीलप्रमाणे ३ विषय राहिल्यास तृतीय वर्षात प्रवेश मिळू शकतो. परंतु प्रथम वर्षाचे सर्व विषय सुटल्याशिवाय तृतीय वर्षात प्रवेश मिळत नाही.

M.Com.

Subject (With Credit System)

Semester - I

Sr. No.	Subject Code	Subject
01	101	Management Accounting
02	102	Stratagic Management
03	115	Sep. Paper - I Legal Framwork of Banking
04	116	Sep. Paper - II Central Banking

Semester - II

Sr. No.	Subject Code	Subject
01	201	Financial Analysis & Control
